सोमवार, २१ फेब्रुवारी २०२२ ◆ वर्ष १४ ◆ अंक २१५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

आरक्षणासाठी मराठा समाज आक्रमक/२
पोलादपूर नगरपंचायत कार्यालय कुलूपबंद/५
प्रो कबड्डी लीगमध्ये आज पहिली एलिमिनेटर लढत/६

## 'तिसऱ्या आघाडीने एनडीएला काहीही फरक पडणार नाही'



**मुंबई** : तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांनी रविवारी (दि. २०) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. या भेटीवर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री राव यांनी शिष्टमंडळासमवेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची वर्षा शासकीय निवासस्थानी आणि त्यानंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ना. आठवले म्हणाले की, तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर महाराष्ट्रात येऊन नेत्यांना भेटले. त्यांनी मिळून तिसरी आघाडी स्थापन केली तरी भाजपप्रणित एनडीएला काहीही फरक पडणार नाही. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात पुन्हा एनडीएच सत्तेत येणार आहे. केसीआर यांचे प्रभावक्षेत्र फक्त तेलंगणापुरतेच मर्यादित असून तिसऱ्या आघाडीसाठी त्यांनी राजकीय पुढाकार घेतल्याने काहीही फरक पडणार नाही.

# ज्यांनी तुष्टीकरणाच्या राजकारणात सण रोखले, त्यांना जनता उत्तर देईल

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल

**लखनऊ : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २०) उत्तर प्रदेशातील हरदोई येथे जाहीर सभेला संबोधित केले. ज्यांनी तुष्टीकरणाच्या राजकारणात सण रोखले, त्यांना येथील जनता १० मार्चला उत्तर देईल, असे पंतप्रधान मोदी या वेळी म्हणाले. अहमदाबाद बॉम्बस्फोट प्रकरणाचा संदर्भ देत पंतप्रधानांनी समाजवादी पक्षावर हल्लाबोल केला. अनेक दहशतवाद्यांना फाशीची शिक्षा झाली आहे. आज मी याचा उल्लेख करीत आहे, कारण काही राजकीय पक्षांनी अशा दहशतवाद्यांवर मेहरबानी केली आहे. ही बाब देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोक्याची आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

तुमचा हा उत्साह आपल्या सर्वांसाठी मोठा आशीर्वाद आहे. होळीसारख्या पवित्र सणाचा हरदोईच्या पवित्र भूमीशी असलेला संबंध आपल्या सर्वांना ज्ञात आहे. मला माहीत आहे, या वेळी हरदोई आणि उत्तर प्रदेशच्या लोकांनी दोनदा रंगांची होळी खेळण्याची तयारी केली आहे. भाजपच्या बंपर विजयाची पहिली होळी १० मार्च रोजी साजरी केली जाणार आहे, पण १० मार्चला होळी साजरी करायची असेल, तर त्याची तयारी आतापासूनच मतदान केंद्रावर, घरोघरी जाऊन करावी लागणार आहे, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले.

अहमदाबादमध्ये दोन वेळा बॉम्बस्फोट घडवण्यात आल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. पहिल्या स्फोटानंतर दुसऱ्या स्फोटात त्यांनी सायकलला बॉम्ब बांधून हॉस्पिटलमध्ये स्फोट घडवण्याची योजना आखली होती.



**कधी मुंबईत, तर कधी दिल्ली, जयपूर, बंगळुरू, हैदराबाद, गुवाहाटी, लुधियाना, आगरतळा, इम्फाळ येथे बॉम्बस्फोट झाले. त्या काळात किती शहरे बॉम्बस्फोटांनी हादरली. या हल्ल्यांमध्ये कितीतरी निष्पाप नागरिकांचा बळी गेला, पण ज्यांना आम्हा भारतीयांचा नाश करायचा होता, त्यांना न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे.**

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

संकटमोचन मंदिरावरही त्यांनी हल्ला केला आणि त्या वेळी उत्तर प्रदेशमध्ये सपाचे सरकार होते. सपाने नेहमीच स्वतःच्या फायद्यासाठी अशी पावले उचलली आहेत. २००६मध्ये काशीमध्ये बॉम्बस्फोट झाला होता. संकटमोचन मंदिरातही स्फोट झाला. तेथील कँट रेल्वेस्थानकावरही हल्ला करण्यात आला. २०१३मध्ये समाजवादी पक्षाचे सरकार पुन्हा सत्तेवर आले तेव्हा या लोकांनी शमीम अहमद नावाच्या आरोपीवरील खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला होता, असा आरोप पंतप्रधान मोदींनी केला. अहमदाबाद प्रकरणातही त्यांना दिलासा द्यायचा होता, पण तब्बल २० वर्षांनी यावर न्यायालयाचा निर्णय आला आहे. समाजवादीने दहशतवाद्यांना दया दाखवण्याचे आदेश दिले आहेत. आता देशातील जनता त्यांना सहन करणार नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

२००७मध्ये लखनऊ, अयोध्या येथील न्यायालय परिसरात बॉम्बस्फोट झाले होते. २०१३मध्ये समाजवादी सरकारने तारिक काझमी नावाच्या दहशतवाद्यावरील खटला मागे घेतला, मात्र या प्रकरणातही न्यायालयाने समाजवादी सरकारचे कारस्थान चालू दिले नाही आणि त्या दहशतवाद्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. याचप्रमाणे उत्तर प्रदेशमध्ये एक-दोन नव्हे; तर १४ दहशतवादी हल्ल्यांच्या प्रकरणांमध्ये समाजवादी सरकारने अनेक दहशतवाद्यांवरील खटले मागे घेण्याचे आदेश दिले होते. हे लोक स्फोट घडवत होते आणि समाजवादी पक्षाचे सरकार या दहशतवाद्यांवर कारवाईही होऊ देत नव्हते. समाजवादी पक्ष आणि काँग्रेसच्या नेत्यांची वृत्ती आणखी घातक ठरली आहे. हे लोक ओसामासारख्या दहशतवाद्याला आदराने ओसामाजी असे म्हणतात. बाटला हाऊस चकमकीत दहशतवाद्यांचा खात्मा झाल्यावर या लोकांनी अश्रू ढाळले, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

मी गुजरातचा मुख्यमंत्री असताना अहमदाबादमध्येही बॉम्बस्फोट झाले होते. तो दिवस मी कधीच विसरू शकत नाही. त्याच दिवशी माझे सरकार या दहशतवाद्यांना शोधून त्यांना शिक्षा करेल, असा संकल्प मी केला होता. काही दिवसांपूर्वी या बॉम्बस्फोटातील दोषींना शिक्षा झाल्याचे तुम्ही पाहिले आहे. अहमदाबाद बॉम्बस्फोट प्रकरणाची सुनावणी सुरू असल्याने इतकी वर्षे मी गप्प बसलो होतो. आज न्यायालयाने दहशतवाद्यांना शिक्षा सुनावल्यानंतर मी आता देशासमोर हे प्रकरण मांडत आहे आणि दहशतवाद्यांचे अनेक मॉड्यूल संपवण्यासाठी मी गुजरात पोलिसांचे केलेल्या प्रयत्नांबद्दल आभार मानत आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी या वेळी नमूद केले.

# पनवेलमध्ये अ‍ॅडव्हान्स ट्रॉमा केअर सेंटर, प्रसूती व बालसंगोपन केंद्र उभारावे

## आमदार प्रशांत ठाकूर यांची केंद्रीय आरोग्यमंत्र्यांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री डॉ. मनसुख मांडविया आणि केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी रविवारी (दि. २०) पनवेल येथील खांदा कॉलनीमधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरला भेट देऊन आढावा घेतला. भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी मंत्रीमहोदयांचे स्वागत केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलमध्ये शंभर बेडचे अ‍ॅडव्हान्स ट्रॉमा केअर सेंटर आणि महापालिका क्षेत्रात प्रसूती व बालसंगोपन केंद्र उभारण्यात यावे या मागण्यांचे निवेदन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री डॉ. मनसुख मांडविया यांना दिले.



या दौऱ्यात केंद्रीय आर्थिक सल्लागार निलम्बुज शरण, राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण व अनुसंधान संस्थानचे संचालक डॉ. सुनील गीत्ते, सहसंचालक डॉ. सुधीर वंजे, सीएमओ (एसएजी), डॉ. सुपर्णा खेरा, संचालक प्राध्यापक डॉ. दीपक राऊत, सीनियर मेडिकल ऑफिसर डॉ. अमोल आडे आदी सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### बिल गेट्स म्हणतात, लवकरच आणखी एक महामारी येणार

**वॉशिंग्टन** : मायक्रोसॉफ्ट कंपनीचे संस्थापक बिल गेट्स यांनी लवकरच कोरोनासारखी आणखी एक महामारी जगात येऊ शकते, असे म्हटले आहे. कोविड-१९पासून गंभीर आजारी पडण्याचा धोका नाट्यमयरित्या कमी झाला आहे, कारण लोकांमध्ये या विषाणूविरुद्ध प्रतिकारशक्ती विकसित होत असल्याने हे घडत आहे, असेही त्यांनी एका मुलाखतीमध्ये सांगितले.

### नक्षलवाद्यांना स्फोटके पुरवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**गडचिरोली** : गडचिरोलीतील जिमलगट्टा अंतर्गत भंगारामपेठा गावात नक्षलविरोधी अभियानादरम्यान तेलंगणामधून दामरंचामार्गे छत्तीसगड येथे वाहतूक करीत असलेल्या चार व्यक्तींकडून स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले. घटनास्थळावरून चार आरोपींना पकडण्यात आले असून एक जण फरार झाला आहे. त्याचा शोध सुरू आहे.

# राष्ट्रीय एकात्मतेचा विचार वाढल्याशिवाय प्रांतवाद मिटणार नाही : भय्याजी जोशी

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशात राष्ट्रीय एकतेचा विचार वाढल्याशिवाय प्रांतवाद मिटणार नाही, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्व सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती महाराष्ट्रमार्फत दिल्या जाणाऱ्या श्री गुरुजी पुरस्काराचे वितरण रविवारी (दि. २०) अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहात करण्यात आले. त्या वेळी जोशी बोलत होते. जीवन विद्यामिशनचे प्रल्हाद पै सोहळ्याला उपस्थित होते.

धर्मसंस्कृती क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी ऑल बाथो महासभा आसामचे गणेश दैमारी आणि शिक्षण व अनुसंधान क्षेत्रासाठी इंदूमती काटदरे यांना श्री गुरुजी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एक लाख रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.




भाषावार प्रांतरचना करण्याचा धोका गोळवलकर गुरुजींनी स्वातंत्र्यानंतर व्यक्त केला होता. त्या वेळी त्यांच्या सूचनेकडे गांभिर्याने पाहिले गेले नाही. त्याचे परिणाम आज देशात पहायला मिळत आहेत. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा एकच भाषा असूनही एकत्र राहू शकलेले नाही. प्रांतवाद वाढत आहे. कधी नद्यांच्या पाण्यावरून, कधी सीमा प्रश्नांवरून राज्ये भांडत आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार वाढल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत, असे भय्याजी जोशी म्हणाले.

भारतीय संस्कृतीत विश्वशांती निर्माण करण्याची ताकद आहे, पण धर्म संस्कृतीपासून तरुण पिढी लांब जात आहे. याबाबत तरुणांमध्ये अज्ञान आहे. ते दूर करणे गरजेचे आहे, कारण सुसंस्कृत पिढी ही देशाला महासत्ता बनवेल. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण चुकीचे. एकटा माणूस सुखी होऊ शकत नाही. सर्व सुखी व्हावे हेच आपले ध्येय असले पाहिजे. विचार परिवर्तन करून तरुण पिढी घडवायला हवी, असे प्रल्हाद पै म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र साताळकर यांनी केले, तर रघुजीराजे आंग्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## दुचाकीस्वाराचा अपघाती मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी मार्गावरील खाने आंबिवली थांब्याजवळ दुचाकीला अपघात होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दापिवली गावातील निखिल धनाजी पाटील (वय २१) हा आपल्या ताब्यातील मोटरसायकल (एमएच १४-जेव्ही ७२३९)वरून दांड-रसायनी रस्त्यावरून जात होता. तो खाने आंबिवली थांब्याजवळ आला असताना समोर असलेल्या डम्परला पाठीमागून मोटरसायकलची जोरदार धडक बसली. या अपघातात निखिलचा जागीच दुर्दैवी अंत झाला. अपघाताची नोंद रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## महाडमध्ये महिलांची क्रिकेट स्पर्धा

**महाड : प्रतिनिधी**

येथील क्रिकेट कट्टा ग्रुपच्या वतीने खास महिलांसाठी क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत स्टार क्रिकेट संघाने विजेतेपद पटकाविले, तर झेडपी संघ उपविजेता ठरला.

महिलांना सांघिक खेळांमधून संधी मिळावी यासाठी क्रिकेट कट्टा ग्रुपची स्थापना करून या ग्रुपच्या वतीने रविवारी (दि. २०) महाडमध्ये महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत स्टार संघ, न्यू महाड इलेव्हन संघ, रायझिंग स्टार, न्यूनिक संघ, झेडपी संघ, दिव्यांगांचा पुणे इनिंग स्टार संघ, पंचायत समिती संघांनी सहभाग घेतला. तिसऱ्या क्रमांक न्यूनिक संघाने मिळविला. विजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज म्हणून सोनाली कोरपे, उत्कृष्ट गोलंदाज निकीता जाधव, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक हर्षला शिर्के, अंतिम सामनावीर छाया साळूंखे, मालिकावीर सुगंधा वडाळकर यांना गौरविण्यात आले.

झेडपी संघ हा शिक्षकांचा संघ असून यामध्ये खेळणाऱ्या बहुतांश खेळाडू या पन्नाशीपार वयाच्या असल्याने त्यांचा जोश पाहून त्यांचे विशेष कौतुक होत आहे, तर अपंगत्वावर मात करून क्रिकेट खेळून आम्हीही कुठे कमी नाही हे पुणे इनिंग स्टार या दिव्यांगांच्या संघाने दाखवून दिले.



# खांदेश्वर कोकण महोत्सवाची खांदा कॉलनीत रंगत







## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून आयोजकांना शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनी आणि ओम साई खांदेश्वर महिला व बाल मित्र मंडळाच्या वतीने खांदा कॉलनीत खांदेश्वर कोकण महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सेक्टर ८ येथील पोलीस ठाण्यासमोर मैदानावर आयोजित या महोत्सवाला शनिवारी (दि. १९) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयोजक उपमहापौर सीताताई पाटील आदी उपस्थित होते. या महोत्सवाचे यंदाचे अकरावे वर्ष आहे. सातत्याने हा महोत्सव भरविला जात असल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक केले.

दरम्यान, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनीही या महोत्सवाला सदिच्छा भेट दिली. या वेळी भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे, नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, ओबीसी सेलचे रामनाथ पाटील, मोतीलाल कोळी, गोपीनाथ मुंडे, भीमराव पोवार, अंकुश खेडकर, भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, सरचिटणीस चिन्मय समेळ आदी उपस्थित होते. मान्यवरांनी महोत्सवाला शुभेच्छा दिल्या.

नगरसेविका सीता पाटील यांनी दहा वर्षांपूर्वी या महोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. खांदा वसाहतीची लोकसंख्या कमालीची वाढली आहे. येथील रहिवाशांची मनोरंजन, कला आणि सांस्कृतिक गरज भागविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. त्याला वर्षागणिक नागरिकांचा अतिशय चांगला प्रतिसाद लाभत असल्याचे पहावयास मिळत आहे.



# आरक्षणासाठी मराठा समाज आक्रमक

## खासदार संभाजीराजेंना पाठिंबा देण्यासाठी उपोषणस्थळी उपस्थित राहणार



**पनवेल : वार्ताहर**

सकल मराठा समाज रायगड जिल्ह्याची बैठक पेण येथे रविवारी (दि. २०) झाली. मराठा समाजाच्या मागण्यासंदर्भात छत्रपती खासदार संभाजीराजे २६ फेब्रुवारीपासून आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार आहेत. या उपोषणात रायगड जिल्ह्यातून हजारो मराठा बांधव संभाजीराजेंना पाठिंबा देण्यासाठी आझाद मैदानावर उपस्थित राहणार आहेत.

या संदर्भात झालेल्या बैठकीत सर्व समन्वयकांनी राज्य सरकारवर रोष व्यक्त केला. गेल्या दोन वर्षांपासून संभाजीराजे समाजाच्या प्रमुख ७-८ मागण्यांसंदर्भात आंदोलन करीत आहेत, मात्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे फक्त आश्वासन देत आहेत, पण प्रश्न काही सोडवत नाहीत. म्हणून संभाजीराजेंना आमरण उपोषण करावे लागत आहे, ही बाब महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी आहे. आता तरी राज्य सरकारने आपल्या मागण्या मान्य करून अंमलबजावणी नाही केली तर या सरकारला मराठा समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, अशी भूमिका सर्व समन्वयकांनी व्यक्त केली. आणि रायगड जिल्हा पूर्ण ताकदीने छत्रपती संभाजीराजेंसोबत राहिल, असा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

या बैठकीला राज्य समन्वयक विनोद साबळे, मारुती पाटील, संतोष पवार, मंगेश दळवी, हरीश बेकावडे, प्रदीप देशमुख, नरेश सावंत, प्रवीण बैकर, अमित यादव आदी उपस्थित होते.





**पनवेल : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती शनिवारी खांदा कॉलनीतील सेक्टर ७ मधील रहिवाशी एकता संघाच्या वतीने साजरी करण्यात आली. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत शिवरायांना अभिवादन केले. श्री गणेश दुर्गामाता मंदिरात झालेल्या या शिवजयंती कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, उपमहापौर सीताताई पाटील आदी उपस्थित होते.**



**उलवे नोड : आम्ही उलवेकर मित्र मंडळाच्या वतीने उलवे नोडमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत अभिवादन केले. या वेळी सचिन राजे व सहकारी उपस्थित होते.**

# नवी मुंबईत शिवजयंती उत्साहात

## आमदार गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती नेरुळ आग्रोळी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नवी मुंबई रिक्षा चालक मालक संघटना आणि आयकर वसाहत मित्र मंडळाच्या वतीने आग्रोळी आयकर वसाहत येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भाजपचे सुभाष गायकवाड यांच्या पुढाकाराने आयोजित या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी खासदार संजीव नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, भाजप महामंत्री माजी नगरसेवक निलेश म्हात्रे आदींनी भेट देऊन शिवप्रेमींना प्रोत्साहन दिले. सर्वश्री विठ्ठल गायकवाड, गोरख वाघ, ज्ञानेश्वर तरटे, गोकुळ सोनावणे, संजय



चव्हाण, प्रकाश सणस आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

नेरुळ सेक्टर २मध्ये शिवजयंतीनिमित्त किल्ले कोरीगड, मुळशी, जिल्हा पुणे येथू भगवा दौड करून आणलेल्या शिवज्योतचे व शिवरायांच्या प्रतिमेचे नेरूळ पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक वर्षा काळे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

नेरुळ भाजप वार्ड क्र. ८७च्या वतीने अॅड गणेश रसाळ यांच्या नेतृत्वाखाली शिवजयंती साजरी झाली. या वेळी हनुमंत डांगे, रामू शिरवाळे, महादेव सणस, सीताराम गायकवाड यांसह शिवप्रेमी उपस्थित होते. भाजप नेते, माजी महापौर जयवंत सुतार यांनी भेट देऊन शिवप्रेमींचा उत्साह वाढवला.

# आदिवासींना जातीच्या दाखल्यांचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांचे निर्देशान्वये कातकरी उत्थान अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रमामध्ये पनवेल तालुक्यतील एक हजार ८५० कातकरी जातीचे दाखले तयार करण्यात आले. त्याचे वाटप उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्या हस्ते आखाडावाडी, कल्हे येथून सुरू करण्यात आले. या वेळी तहसीलदार विजय तळेकर यांच्यासह तलाठी, मंडल अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

आदिवासी बांधवांचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थर उंचावण्याच्या दृष्टीने विविधांगी लोकाभिमुख व जनकल्याणकारी शासन योजना तळागळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची प्रक्रीया कातकरी उत्थान अभियान अंतर्गत सुरू आहे. कातकरी लोकांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा यासाठी कातकरी उत्थान योजना ही योजना आणली आहे. या योजनेमुळे कातकरी समाजाला शासकीय योजनांचा प्रत्यक्ष तत्काळ लाभ मिळणार आहे. भविष्यात शासन योजनेअंतर्गत विशेष प्रयत्न केले जाणार असून स्थानिक रोजगार निर्मितीवर भर दिला जाणार आहे असे उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांनी सांगितले.

कातकरी उत्थान अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रमात पनवेल तालुक्यामधील एक हजार ८५० कातकरी जातीचे दाखले तयार करण्यात आले त्याचे वाटप करण्यात आले.

# उरण वकील संघटनेच्या अध्यक्षपदी दत्तात्रेय नवाळे

**उरण : वार्ताहर**

उरण तालुका वकील संघटनेची निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीत अध्यक्षपदी अॅड. दत्तात्रेय नवाळे बहुमताने निवडून आले.

सन २०२२-२३करिता निवड झालेल्या या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी भारती भोईर, किशोर ठाकूर, सचिवपदी प्रसाद पाटील, खजिनदारपदी अर्चना माळी, ऑडिटर म्हणून संतोष पाटील, सभासद अझीमन रईस अहमद



अन्सारी, वृषाली पाटील, विपूल ठाकूर, धीरज डाकी यांचा समावेश करण्यात आला आहे.

अॅड. दत्तात्रेय नवाळे ची अध्यक्षपदी निवड होताच त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. मान्यवरांनी मोबाईलद्वारे व प्रत्यक्षात भेट घेऊन नवाळे यांचे अभिनंद करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**खोपोली : भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील व अशोक पाटील यांचे चिरंजीव अमेय याचा विवाह चित्रा हिच्याशी झाला. या लग्न सोहळाच्या निमित्ताने आयोजित स्वागत समारंभात भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून वधू-वरास आशीर्वाद दिले. या वेळी जिल्हा संघटक अविनाश कोळी, उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, शहर सरचिटणीस हेमंत नांदे, उपाध्यक्ष दिलीप पवार, व्यापारी सेलचे कीर्ती ओसवाल, राहुल जाधव, गोपाळ बावस्कर, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुळकर, सरचिटणीस विनायक माडपे आदी उपस्थित होते.**

**पनवेल : शहराच्या प्रवेशद्वारावर स्वच्छता व बंदिस्त गटारे असणे महत्त्वाचे असल्याने विशेष लक्ष देऊन स्वच्छता व गटारांचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे, असे पत्र पाहणीनंतर महापालिका प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे यांनी आयुक्तांना दिले. एमएमआरडीए व पीडब्ल्यूडीचे दुर्लक्ष असल्याने व वारंवार सांगूनही काम करीत नसल्याने गटार बंदिस्त करण्याबाबतचे निवेदन महापालिका आयुक्तांना देण्यात आले.**



# नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या कार्यालयासमोर शिवजन्मोत्सव साजरा

**पनवेल : वार्ताहर**

सालाबादप्रमाणे या वर्षीही छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयासमोर साजरा करण्यात आला. येथे मागील वर्षापासून थेट किल्ले रायगडावरून शिवज्योत नागरिकांच्या दर्शनासाठी आणली जाते. या अनोख्या उपक्रमाचा एक भाग म्हणून मागच्या वर्षी शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते. याचबरोबर सायंकाळी महाराजांच्या जीवनावर आधारित दोन खास कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

शिवकल्याण राजा महाराजांच्या जीवनावरील आधारित पोवाडे आणि गाण्यांचा कार्यक्रम प्रभागातील स्वर आरंभ संगीत अकादमीच्या होतकरू गायकांनी सादर केला. आगळ्यावेगळ्या प्रकारचे कीर्तन, समर्थ भक्त, कॉर्पोरेट कीर्तनकार समीर लिमये यांनी सादर करून आलेल्या सर्व शिवप्रेमी नागरिकांना मंत्रमुग्ध करून टाकले.



# शिवजयंतीनिमित्त खारघरमध्ये महा-नोंदणी शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष व भारतीय डाक घर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि पनवेल महापालिकेचे नगरसेवक निलेश मनोहर बाविस्कर प्रभाग क्रमांक ६, खारघर यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकोपयोगी मोफत महा-नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरात ई-श्रम कार्ड, आधार कार्ड मोबाईलबरोबर लिंक करणे, सुकन्या योजना, भारत डाक घर यांच्या महत्त्वपूर्ण योजना सर्व नागरिकांना समजावून सांगण्यात आल्या. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, खारघर-तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस किर्ती नवघरे, सोशल मीडिया सेल अध्यक्ष मोना अडवाणी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.


# नगरसेविका नेत्रा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सुविधांचे मोफत अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने खारघरमधील नागरिकांसाठी मोफत सुविधांचे अभियान राबविण्यात येणार आहे.

यात प्रामुख्याने ० ते ५ वयोगटातील मुलांचे नवीन आधार कार्ड बनविणे, सुकन्या समृद्धी खाते, आधार कार्डला मोबाईल नंबर/ ई-मेल आयडी लिंक करणे असे उपक्रम आहेत. हे शिबिर २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ४ वा. खारघर सेक्टर १९ येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र (३३ केव्ही महावितरण सब स्टेशन)च्या मागे होईल.

अधिक माहितीसाठी गोपाल (९९६०२२०९४६), निरंजन (७७५६९३११९९) किंवा कुणाल (८१०८६७५१३९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. २१ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ७. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर ८. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोव्हॅक्सिन

- ९. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- १०. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- ११. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)

१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- केईएस व्ही. के. हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय (२५०)
- सेंट जोसेफ हायस्कूल कळंबोली (७००)
- हुडा स्कूल
- विभग्योर स्कूल खारघर
- सेंट जोसेफ हायस्कूल न्यू पनवेल (५००)
- शिवाजी स्कूल रोहिंजन (५००)

# ११ लाख नागरिकांनी घेतले दोन्ही डोस

## नवी मुंबई मनपाची १०० टक्के लसीकरणाकडे वाटचाल

**नवी मुंबई : बातमीदार**



कोरोनाबाधितांच्या संख्येत मागील काही दिवसांमध्ये घट होताना दिसत असून कोरोनाची तिसरी लाट ओसरल्याचे चित्र पहायला मिळते आहे. तथापि कोविड विषाणू अजून संपलेला नाही याची जाणीव ठेवून मास्कचा नियमित वापर व प्रतिबंधात्मक नियमावलीचे पालन करण्यासाठी नवी मुंबई महापालिकेकडून जनजागृती केली जात आहे व भर दिला जात आहे.

१८ वर्षावरील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर लसीकरण झालेले असल्यामुळे कोरोनाबाधितांची संख्या चार हजारापर्यंत पोहचूनही रुग्ण गंभीर होण्याचे प्रमाण मर्यादित होते. त्यामुळे तिसऱ्या लाटेची तीव्रता तितकीशी जाणवली नाही. नवी मुंबई महापालिकेने लसीकरणाचे योग्य नियोजन केल्यामुळे व १०२पर्यंत लसीकरण केंद्र सुरू केल्यामुळे कोविडचा पहिल्या डोसचे १०० टक्के लसीकरण पूर्ण करणारी नवी मुंबई ही पहिली महापालिका होती. तोच वेग कायम राखत नवी मुंबई महापालिकेने दुसऱ्या डोसचेही लसीकरण लवकरात लवकर पूर्ण व्हावे व नागरिक लस संरक्षित व्हावेत याकडे विशेष लक्ष दिले. त्या अनुषंगाने १०,९३,३४१ नागरिकांना कोव्हीड लसीचे दोन्ही डोस दिलेले असून ९८.७६ टक्के नागरिक पूर्णतः लस संरक्षित झालेले आहेत.

१८ वर्षावरील नागरिकांच्या लसीकरणाप्रमाणेच १५ ते १८ वयोगटातील कुमारांच्या पहिल्या डोसचेही १०० टक्के लसीकरण पूर्ण झाले असून त्यांच्या दुसऱ्या डोसचेही लसीकरण गतीमानतेने पूर्ण करून घेण्यात येत आहे.

दुसऱ्या डोसच्या लसीकरणाचेही सुव्यवस्थिती नियोजन करण्यात आले असून २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, चार रुग्णालये, इएसआय रुग्णालय वाशी येथील जम्बो केंद्र, एपीएमसी मार्केटमधील दाणा बाजार व भाजी मार्केट तसेच जुईनगर रेल्वे कॉलनी आरोग्य केंद्र या ठिकाणी दुसऱ्या डोसची कोविशिल्ड लसीकरण सुविधा उपलब्ध आहे तसेच नवी मुंबई महापालिकेची चार रुग्णालये आणि इएसआय रुग्णालय वाशी येथील जम्बो केंद्र या ठिकाणी कोव्हॅक्सिन लसीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. १५ ते १८ वयोगटातील कुमारवयीन मुलांच्या दुसऱ्या डोससाठी शाळांमध्येही लसीकरण केंद्र सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

याशिवाय दुसऱ्या डोससाठी पात्र असणाऱ्या लाभार्थ्यांपर्यंत लसीकरण आपल्या दारी या विशेष मोहिमेंतर्गत पोहचून दुसऱ्या डोसच्या लसीकरणाचा वेग वाढविला जात आहे. याकरिता प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र पातळीवर ७८७ पथके कार्यरत असून १ फेब्रुवारीपासून आतापर्यंत ३,७९,९१८ गृहभेटी देऊन १५,८८९ लाभार्थ्यांना लसीकरणासाठी कार्ड वाटप करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे ६० वर्षावरील नागरिकांनी तिसरा प्रिकॉशन डोस घेण्यासाठीही विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून नवी मुंबई महापालिका क्षेत्रात दररोज होणाऱ्या प्रिकॉशन डोसच्या लसीकरणातील लाभार्थी मानकऱ्याचे छायाचित्र महानगरपालिकेच्या विविध समाज माध्यमांवरून प्रसारित करण्यात येत आहे. त्यामुळे प्रिकॉशन डोसच्या लसीकरणालाही वेग आला असून दररोज ५५० पर्यंत ज्येष्ठ नागरिक प्रिकॉशन डोसचा लाभ घेताना दिसत आहेत.

> ***कोविडची लाट ओसरताना दिसत असली तरी कोव्हीड अजून संपलेला नाही याची जाणीव ठेवून प्रत्येकाने मास्कचा वापर नियमित करावा तसेच सुरक्षित अंतर व इतर कोव्हीड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करावे. त्याचप्रमाणे लसीच्या दुसऱ्या डोसची तसेच प्रिकॉशन डोसची वेळ आल्यानंतर त्वरीत महानगरपालिकेच्या लसीकरण केंद्रांमध्ये जाऊन विनामुल्य लसीकरण करून घ्यावे आणि लस संरक्षित व्हावे.***
>
> ***–अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका***

# स्मार्ट गाव शिवकरचे पाणीबिल थकले

**पनवेल : वार्ताहर**

जिल्ह्यात स्मार्ट गाव ठरलेल्या पनवेलमधील शिवकर ग्रामपंचायतीचे लाखो रुपयांचे पाणीबिल थकले असल्याचे समोर आले आहे. नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या शिवकर ग्रामपंचायतीने २२ लाख ४० हजार रुपये थकविल्यामुळे स्मार्ट ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाकडून घेण्यात आलेल्या स्मार्ट गाव योजनेत शिवकर ग्रामपंचायतीने २०१८–१९मध्ये रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला होता. या स्पर्धेत बाजी मारल्याबद्दल राज्य सरकारकडून ग्रामपंचायतीला ५० लाखांचा निधीही बक्षीस म्हणून देण्यात आला. जिल्ह्यातील ८०४ ग्रामपंचायतींमधून पनवेल तालुक्यातील शिवकर गावाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे या ग्रामपंचायतीतील उपक्रम कौतुकाचा विषय ठरला होता, मात्र या ग्रामपंचायतीला हा पुरस्कार मिळाला कसा, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

ग्रामपंचायतीने २०१७पासून पाणीपट्टी थकवली आहे. तब्बल २२ लाख ४० हजार रुपयांची पाणीपट्टी थकल्यामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या नवी मुंबई महापालिकेने ग्रामपंचायतीकडे पाणीपट्टी वसुलीसाठी तगादा सुरू केला आहे. महिन्याला ६० ते ७० हजार रुपयांचे पाणीबिल ग्रामपंचायतीला येते. सहा महिन्यांपूर्वी २०१२मध्ये बांधण्यात आलेली टाकी पुनर्बांधणीसाठी तोडण्यात आली. थाटामाटात नव्या टाकीचे भूमिपूजन झाले, मात्र अद्यापही काम सुरू झालेले नाही. नवी मुंबई महापालिकेच्या पाइपलाइनमधून थेट पाणी दिले जात असल्यामुळे नागरिकांकडून पाण्याचा वापर वाढला असल्याचे कारण ग्रामपंचायतीकडून सांगितले जात आहे.

२०२०मध्ये काही थकीत रक्कम भरली होती, मात्र थकीत रक्कमेवर व्याज लागल्यामुळे ही रक्कम वाढली असल्याचे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सचिन पाटील यांनी सांगितले. दोन वर्षांपासून पाणीबिल भरले नसल्याचेही त्यांनी सांगितले. तीन वर्षांपूर्वी स्मार्ट गाव ठरलेल्या शिवकर गाव आता लाखो रुपयांचे पाणीबिल थकविणारे 'स्मार्ट गाव' झाले, अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे. या संदर्भात सरपंच अनिल ढवळे यांनी आमच्या गावचे पाणीबिल थकले आहे ही वस्तुस्थिती आहे, अशी कबुली देऊन वसुली होत नसल्यामुळे पाणीबिल भरलेले नाही, असे म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे जावे -अरुणशेठ भगत

## गव्हाण विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इयत्ता बारावी बोर्डाची परीक्ष समीप आली असून विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे जावे असे प्रतिपादन, रयत शिक्षण संस्थे चे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेसाठी प्रविष्ट असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्या वेळी अध्यक्षपदावरून पदावरून बोलताना अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास वृद्धिंगत करून उत्तम यश संपादन करण्याचा सल्ला दिला. विद्यार्थ्यांच्या पालक व शिक्षकांनीही त्यांना यथोचित सहकार्य करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

या मेळाव्यास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे, संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य तसेच रयत को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रमोद कोळी, लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, उपप्राचार्य जगन्नाथराव जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्युनिअर कॉलेज प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, जुनियर कॉलेजचे सर्व अध्यापक,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजू खेडकर यांनी केले.




# वाहनाच्या धडकेने वृद्धाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील कोन गाव हद्दीत राहुल पार्क हॉटेलसमोर एका अज्ञात वाहनाची ठोकर एक्टीव्हाला बसून झालेल्या अपघातात स्कूटरस्वार वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाला.

जनार्दन कुरंगळे (वय ७१, रा. भिंगार) हे साखरपूडा आटोपून घरी एक्टीव्हा (एमएच ४६ एडब्लू ५८३३) वरून जात होते. या वेळी कोन गाव हद्दीतील राहुल पार्क हॉटेलसमोर त्यांच्या गाडीस अज्ञात वाहनाची ठोकर बसल्याने झालेल्या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# चोरलेली स्कूटी पोलिसांनी केली हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

रबाळे येथून चोरी झालेली स्कूटी खारघर वाहतूक पोलिसांनी हस्तगत केली आहे. खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश गावडे यांनी पोलीस नाईक सुरेश कासार व पोलीस अमलदार मयुर पाटील यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले आहे.

खारघर वाहतूक पोलीस नाईक सुरेश कासार व अमलदार मयुर पाटील हे नेहमीप्रमाणे खारघर शहरामध्ये वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता मोटरसायकलवरून गस्तीवर असताना उत्सव चौक, सेक्टर ५ जवळील डोंगरी गवतात एक निळ्या रंगाची होंडा एक्टिवा स्कूटी धूळ खाऊन पडलेली दिसून आली. या स्कूटीचे सीट लॉक तुटलेले होते व पेट्रोल लॉकही तुटलेले होते. स्कूटीचा नंबर एमएच वीके ९३३८असा असून पोलिसांनी गाडीचा नंबर तपास करता गाडीचा नंबर चुकीचा असल्याचे वाहतूक अंमलदार मयुर पाटील यांना कळाले. त्यांनी गाडीच्या चेसिस व इंजिन या दोन्ही नंबरची चौकशी जवळील होंडा शोरूममध्ये केली असता त्यांना गाडीचा खरा नंबर एमएच ४३ बीवी ७९१९ व गाडी मालक दिनेश कुमार पटेल (रा. रबाळे) असल्याचे कळाले. पोलिसांनी पटेल यांना बोलावले. त्यांनी गाडी बघताच ही माझी स्कूटी आहे असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश गावडे यांना सांगितले. ही स्कूटी ३१ डिसेंबर २०२१ रोजी रात्री सक्षम सोसायटी रबाळे येथून चोरी झाल्याचे सांगितले. त्यांनी १ जानेवारी २०२२ रोजी याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात नोंदवली.

खारघर वाहतूक पोलिसांनी रबाळे पोलीस ठाण्यात चौकशी केली असता त्या गाडीचे नोंद असल्याचे रबाळे पोलिसांनी सांगितले. पुढील संपूर्ण तपासणी करून दिनेश पटेल यांचा मोठा भाऊ शंकरलाल पटेल यांना ही गाडी रबाळे पोलीस अंमलदार प्रकाश पाटील यांच्या साथीने देण्यात आली.

# नवीन पनवेलमध्ये केशरचंदजी बांठिया जयंती, पारितोषिक वितरण

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील के. आ. बांठिया महाविद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज नुकतीच केशरचंदजी बांठिया यांची १३६वी जयंती आणि विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला.




विद्यालयाच्या सभागृहामध्ये सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन, ईशस्तवन व स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. विद्यालयाच्या संगणक शाळा प्रणालीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुधागड एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी मिलिंद जोशी, प्रमुख पाहुणे म्हणून मोतीलाल बांठिया आणि आप्पासाहेब मगर होते. व्यासपीठावर प्राचार्य माळी, उपप्राचार्य एच. एन. दहिवदकर आणि उपमुख्याध्यापक सी. के. तिरमले उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जोशी आणि प्रमुख पाहुणे मगर यांनी मनोगत व्यक्त केले. कै. केशरचंदजी बांठिया यांना १३६व्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. उपस्थित आदर्श विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यांना आदर्श पुरस्कार आणि बक्षीस वितरण करण्यात आले.

सूत्रसंचालन तेजश्री पाटील व ललिता पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक बी. यु. महाजन, जे. के. कुंभार तसेच इंग्रजी माध्यमाच्या पर्यवेक्षिका सौ. खेडकर व सौ. कट्टा यांचे मोलाचे योगदान लाभले. शेवटी प्राचार्य माळी यांनी सर्व उपस्थितांचे आणि पाहुण्यांचे आभार मानले.

# करंजाडेमध्ये शिवजयंती उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे सेक्टर ३ दुधेविटेवरी कॉम्प्लेक्स येथे दूधे बिल्डर्स यांच्या वतीने शिवजयंती कार्यक्रम यंदाही अतिशय जल्लोषात साजरा झाला. कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

सोसायटीमध्ये पोवाडा, चलचित्र, देखावा, नृत्य सादर केले. करंजाडे ही नव्याने विकसित झालेले शहर आहे. या शहरांमध्ये तुकाराम दुधे बिल्डर्स हे एकमेव बिल्डर्स आहेस जे सलग गेले तीन वर्ष आपल्या सदनिकेचीच्या आवारात स्वतः शिवजयंती उत्सव साजरा करतात. दरवर्षी सदनीकतील मुलान मुलींसोबत तसेच सदनिकेच्या बाहेरी आदिवासी पाड्यातील आणि इतर मुलांनाही कार्यक्रमात सहभाग करून त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन तुकाराम दूधे यांच्याकडे दिले जाते दिले जाते. प्रसिद्ध शिवचरित्र व्याख्याते प्रज्ञेश खेडेकर या कार्यक्रमाला वक्ते म्हणून लाभले होते. कार्यक्रमाची सांगता शिवचरित्र सांगून झाली.




**शिवजयंती उत्सवानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस अशोक मोटे, भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, कळंबोली शहर अध्यक्ष बाबा घुटुकडे आदींनी विविध ठिकाणी भेटी दिल्या.**



# 'विद्याभवन'मध्ये शिवकालीन वस्तू आणि चित्र प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शैक्षणिक संकुलात शिवजयंतीनिमित्त शिवप्रेमी पंकज भोसले यांच्या सहयोगाने शिवकालीन वस्तू आणि चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन संचालक दिनेश मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



गोफ, तलवारी, बिचवे, भाले, खंजीर अशा प्रकारची शिवकालीन शस्त्रे, विविध शिवकालीन खेळ, मोडी लिपीत लिहिलेले ग्रंथ आणि कागदपत्रे, गडकिल्ल्यांची फोटोसह माहिती देणारी चित्रे, शिवकालीन नाणी आणि संक्षिप्त बोधपट असे या प्रदर्शनाचे स्वरूप असून विद्याभवनच्या आणि परिसरातील सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना याचा लाभ घेता येणार आहे. सर्व वस्तू तसेच शस्त्रांची माहिती देण्यासाठी काही स्वयंसेवक या ठिकाणी उपलब्ध आहेत.

या प्रदर्शनच्या उद्घाटनाच्या वेळी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि शिवप्रेमी पंकज भोसले यांचा सत्कार करण्यात आला. दिनेश मिसाळ तसेच पंकज भोसले यांनी या प्रदर्शनाचे नवीन पिढीसाठी असलेले महत्व यावेळी व्यक्त केले. मोडी लिपीत आपले नाव कसे असेल या उत्सुकतेने अनेक विद्यार्थी पंकज भोसले यांची प्रत्यक्ष भेट घेत आहेत. या वेळी शिवराज्याभिषेकदिनोत्सव सेवा समितीचे खजिनदार राजेंद्र देसाई, इतिहास अभ्यासक संजय ढमाळ, मुख्याध्यापिका श्रीजा नायर, मेघाराणी जोशी, राजकुमारी इंदलकर, मनिषा मुळिक व पर्यवेक्षिका अस्मिता सलगर हे उपस्थित होते. हे प्रदर्शन १८ ते २० जानेवारीदरम्यान सकाळी १० ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत असून शेवटच्या दिवशी सर्वांसाठी खुले आहे.

# मोठी जुई येथील शाळेत स्मार्ट टीव्हीचे उद्घाटन

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा मोठी जुई येथे शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या स्मार्ट टीव्हीचे उद्घाटन नुकतेच उरण पंचायत समितीच्या वरिष्ठ विस्ताराधिकारी प्रियंका पाटील तसेच चिरनेर केंद्राचे केंद्रप्रमुख टी. जी. म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.



मुख्याध्यापक सुभाष म्हात्रे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या ५२ इंची स्मार्ट टीव्हीचे पूजन करून व फित कापून उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पुरुषोत्तम भोईर, उपाध्यक्ष तृप्ती बंडा, शाळेचे मुख्याध्यापक सुभाष म्हात्रे, शाळेच्या सहशिक्षिका रंजना म्हात्रे, संजय होळकर, दर्शन पाटील, संदीप गावंड, शर्मिला पाटील, यतीन म्हात्रे, ज्योती बामनकर व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

शाळेमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प असल्याने तसेच वायफाय सुविधा असल्याने त्याचा उपयोग निश्चितपणे विद्यार्थी वर्गाला होईल यात शंका नाही, असे मत पाटील मॅडम यांनी काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक संजय होळकर यांनी केले.

## संपादकीय

# टीम इंडियामध्ये रोहितपर्व

श्रीलंकेविरुद्ध मायदेशी होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली. विराट कोहली कर्णधारपदावरून पायउतार झाल्यानंतर टीम इंडियाच्या कसोटी संघाचे नेतृत्वही रोहित शर्माकडे देण्यात आले आहे. यामुळे आता टी-२०, वनडे आणि कसोटी अशा तिन्ही क्रिकेट प्रकारांत रोहित नवा 'किंग' असणार आहे.

**भारत आणि श्रीलंका यांच्यातील टी-२० आणि कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. अपेक्षेप्रमाणे मुंबईकर खेळाडू रोहित शर्माकडे कसोटी संघाचे कर्णधारपद देण्यात आले आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर कसोटी मालिका गमावल्यानंतर विराट कोहलीने कसोटी संघाचा राजीनामा दिला होता. त्याचवेळी रोहितकडे हाही मूकुट येणार होता, पण द. आफ्रिका दौऱ्यात रोहित फिट नसल्याने केएल राहुलकडे ही जबाबदारी देण्यात आली होती, परंतु आता रोहित कसोटीचाही पूर्णवेळ कर्णधार असणार आहे. याबाबत बोलताना निवड समितीचे प्रमुख चेतन शर्मा यांनी, रोहित हा कसोटी कर्णधारपदासाठी एकमेव पर्याय होता. जुन्या आणि नव्या खेळाडूंची एकत्रित मोट बांधण्याची क्षमता त्याच्यात आहे. त्यामुळे रोहितकडे तिन्ही प्रकारांचे नेतृत्व आता असेल, असे पत्रकार परिषदेत सांगितले. त्याचप्रमाणे केएल राहुल, जसप्रीत बुमरा आणि ऋषभ पंत या तिघांना कर्णधारपदाचे पर्याय म्हणून विकसित केले जाणार आहे, असे सुतोवाच केले. रोहितने जेव्हा जेव्हा कर्णधारपदाची संधी मिळाली तेव्हा निवड समितीचा विश्वास सार्थ ठरविलेला आहे. एक आक्रमक फलंदाज म्हणून ओळखला जाणारा रोहित कर्णधार म्हणून मात्र शांत, संयमी असतो. विराट कोहलीच्या अगदी विरुद्ध त्याचे व्यक्तिमत्त्व आहे. त्याने आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करतानाही आपली प्रतिभा सिद्ध केली आहे. इतर अनुभवी खेळाडूंचा फॉर्म खराब असल्याने कसोटी संघाच्या कर्णधारपदाची माळही रोहितच्या गळ्यात पडणार असे मानले जात होते आणि झालेही तसेच. आता रोहितसमोर वरिष्ठ आणि नवोदित खेळाडूंचे संतुलन राखण्याचे आव्हान असेल. श्रीलंका संघ तुल्यबळ नसला तरी मागील वेळी याच संघाने भारतीय संघाला घाम फोडला होता. त्याचे उट्टे फेडण्याची चांगली संधी आगामी मालिकेत 'रोहितसेने'ला आहे. श्रीलंकेविरुद्ध टी-२० आणि कसोटी संघाच्या उपकर्णधारपदी जसप्रीत बुमराहची निवड करण्यात आली आहे. याआधी रोहित शर्माच्या अनुपस्थितीत दक्षिण आफ्रिका दौऱ्यावरील वनडे मालिकेत बुमराहने उपकर्णधारपदाची धुरा सांभाळली होती. त्यामुळे एकाच वेळी मुंबईकर खेळाडू आता कर्णधार, उपकर्णधारपदी असतील. निवड समितीने खराब फॉर्ममुळे चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे यांच्यासह वृद्धिमान साहा, इशांत शर्मा या चौघांना बाहेरचा रस्ता दाखविला आहे. त्याचवेळी प्रियांक पांचाळ, केएस भरत, सौरभ कुमार या नव्या चेहऱ्यांना कसोटी मालिकेसाठी संघात स्थान देण्यात आले आहे. एक अष्टपैलू शार्दुल ठाकूरला श्रीलंका दौऱ्यात पूर्णपणे विश्रांती देण्यात आली असून दुसरा अष्टपैलू रवींद्र जडेजाचे संघात पुनरागमन झाले आहे. अशा प्रकारे भारतीय संघात संक्रमण पहावयास मिळत आहे. कर्णधार म्हणून जबाबदारी सांभाळताना रोहितला आपल्या फलंदाजीतही चमक दाखवणे आवश्यक आहे. अनेकदा तो आळसावलेला वाटतो. त्याला स्वत:मध्ये बदल करावा लागेल. आगामी संघबांधणीसाठी तो कशा प्रकारे खेळाडू हाताळतो यावर त्याच्यासह संघाचे भवितव्य ठरणार आहे.**

# सार्वजनिक शौचालय : स्थानिकांची गैरसोय आणि राजकारण

***नेरळ वाल्मिकीनगर येथील सार्वजनिक शौचालय ९फेब्रुवारी रोजी तोडल्याने स्थानिक आदिवासी लोकांची गैरसोय होत होती. त्याबद्दल स्थानिकांनी पत्रकार अजय गायकवाड यांच्याकडे आपली कैफियत मांडली होती. गायकवाड यांनी घटनास्थळी जाऊन तसेच स्थानिक महिलांशी बोलून माहिती घेतली. त्यामुळे ते शौचालय तोडण्यासाठी अर्ज करणारे मॉन्टी कदम यांनी पत्रकार गायकवाड यांना १५ फेब्रुवारी रोजी शिवीगाळ करीत धक्काबुक्की केली.त्यांना रस्त्यावर ढकलून देत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी नेरळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपअधीक्षक विजय लगारे हे करीत आहेत, मात्र आरोपील अद्याप अटक झालेली नाही.***

**खबरबात**
संतोष पेरणे

नेरळ ग्रामपंचायतने गावातील वाल्मिकीनगर भागातील २० वर्षांपूर्वी बांधलेले सार्वजनिक शौचालय तोडले आहे. त्यामुळे शौचालया अभावी परिसरातील रहिवाशांच्या होत असलेल्या गैरसोयीबद्दल नेरळमध्ये चर्चा सुरु आहे. हे सार्वजनिक शौचालय तोडण्याच्या प्रकरणात पत्रकार अजय गायकवाड यांना मारहाण झाल्याने जिल्ह्यातील पत्रकारात संताप निर्माण झाला आहे. त्यानिमित्ताने हा लेख...

नेरळ गावातील आदिवासी लोकांची वस्ती असलेल्या वाल्मिकीनगर भागात ग्रामपंचायतीने २० वर्षांपूर्वी दोन सीटचे सार्वजनिक शौचालय बांधले होते. या भागात वस्ती वाढल्याने स्थानिक ग्रामस्थांची मागणी लक्षात ग्रामपंचायतीने १० वर्षांपूर्वी या ठिकाणी असलेले सार्वजनिक शौचालय चार सीटचे केले होते. या शौचालयामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून ते तोडण्यात यावे, अशी मागणी एका स्थानिक राहिवाशाने मागील महिन्यात ग्रामपंचायतीकडे केली होती. त्यामुळे सदर सार्वजनिक शौचालय तोडण्यास हरकत असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास कळवावे, असा फलक नेरळ ग्रामपंचायतीने त्या सार्वजनिक शौचालयावर लावून ठेवला. त्यानंतर ९ फेब्रुवारी रोजी ग्रामपंचायतीने ते सार्वजनिक शौचालय तोडून टाकले. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांची गैरसोय होऊ लागली. उघड्या जागेत शौचास जाण्याची वेळ नेरळ ग्रामपंचायतीने वाल्मिकीनगरमधील कातकरी समाजाच्या लोकांवर आणली.

हागणदारी मुक्त अभियान राबविणाऱ्या नेरळ ग्रामपंचायतीन जुने सार्वजनिक शौचालय तोडण्याआधी नवीन जागेत नवे सार्वजनिक शौचालय बांधून देण्याची आवश्यकता होती. सार्वजनिक शौचालय तोडून परिसरातील लोकांची गैरसोय करण्याचा अधिकार नेरळ ग्रामपंचायतीला दिला कोणी? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

हे सार्वजनिक शौचालय तोडण्यासाठी नेरळ ग्रामपंचायतीने जेसीबी मशीन आणले होते. त्याचा खर्च आणि आता नव्याने सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी येणारा खर्च जनतेच्या खिशातून होणार आहे. जुने सार्वजनिक शौचालय तोडून टाकावे म्हणून अर्ज करणाऱ्या व्यक्तीकडून ग्रामपंचायत हा सर्व खर्च वसूल करणार आहे काय? असा प्रश्नदेखील उपस्थित होत आहे.

आमच्या वाडीच्या समोरून कर्जत- कल्याण राज्यमार्ग जातो. या रस्त्यावर कायम वाहनांची वर्दळ असते. हातात डब्बा घेऊन रस्ता ओलांडताना लाजदेखील वाटते, असे रंजना वाघ सांगतात. तर शौचालय तुटल्याने आम्हला गावाबाहेर जावे लागत असून,खूप मोठी गैरसोय होत आहे अशी तक्रार गर्जना मुरकुटे यांनी केली.

**सार्वजनिक शौचालय बांधून द्यावे...**

सार्वजनिक शौचालय नसल्याने परिसरातील ग्रामस्थांची विशेषत: महिलांची कुचंबणा, गैरसोय होत आहे. शौचालय तोडण्याआधी ग्रामपंचायतीने पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे होते.परंतु ना दुरुस्तीच्या नावाखाली ग्रामपंचायतीने हे शौचालय जमिनदोस्त केले. त्यामुळे येथे लवकरात लवकर शौचालय बांधून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थ गुरुनाथ मिरकुटे यांनी केली आहे.

**पुन्हा बांधून देणार...**

या सार्वजनिक शौचालयाबाबत ग्रामपंचायत कार्यालयाला तेथील एका व्यक्तीचा तक्रारी अर्ज प्राप्त झालाय. शिवाय हे शौचालय नादुरुस्त झाले होते.तेथे कधीही गंभीर दुर्घटना होऊ शकली असती. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वतीने सुरुवातीला सूचना फलकदेखील लावले होते. शौचालया अभावी ग्रामस्थांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून, त्याच ठिकाणी लवकरात लवकर पुन्हा सार्वजनिक शौचालय उभारण्यात येणार असल्याचे सरपंच उषा पारधी यांनी सांगितले.


(छाया : राज वैशंपायन)

# नागोठणे भाजप कार्यालयात शिवजयंती

**नागोठणे : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या नागोठणे कार्यालयमध्ये शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

भाजपचे रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, सरचिटणीस आनंद लाड, शिक्षण सेल तालुका अध्यक्ष अहिरे, शितल नागरे, माधुरी रावकर, निलमा राजे, सोनी पांडे, विठोबा माळी, तिरजराव पोलिसानी, हिरामण तांबोळी, दिव्या सुटे, सुजित सिंग आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# कोषाणेमध्ये रक्तदान करून शिवरायांना अभिवादन

**कर्जत : प्रतिनिधी**

शिवजयंती निमित्त कर्जत तालुक्यातील कोषाणे गावामधील युवकांनी शनिवारी (दि. १९) रक्तदान रक्तदान करून शिवरायांना अभिवादन केले.

कोषाणे गावातील युवकांनी येथील श्री भवानी मंदिराच्या सभागृहात घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीच्या सहकार्याने शनिवारी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी शिबिराचे उद्घाटन केले. समर्पण रक्तपेढीच्या डॉ. फईम खान, धीरज गुप्ता, दीपेश सरदार, स्नेहल कांबळे, धनश्री साळवी आदींनी रक्त संकलनाचे काम केले. यावेळी प्रकाश शहा यांच्यासह नवजवान क्रीडा मंडळाचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.


(छाया : विजय मांडे)

# खोपोलीतील आदिवासींसाठी पाण्याची टाकी उभारणी कामाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निफाणवाडी हा आदिवासी कुटुंबांचा अधिवास असलेला पाडा रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील सावरोली नजीक असून या ठिकाणी टाटा स्टीलने निफाणवाडीतील रहिवाशांना पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरवण्यासाठी २० हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यासाठी पायाभरणी केली. यामुळे निफाणवाडी गावातील १३० पेक्षा जास्त रहिवाशांची पिण्याच्या पाण्याची गरज भागवली जाणार आहे.

या वेळी सावरोली ग्रामपंचायतीचे उपसरपंच नागेश मेहतर, ग्रामपंचायत सदस्या नम्रता तटकरे, टाटा स्टीलचे सीएसआर व्यवस्थापक भावेश रावल, डब्ल्युओटीआरच्या मॅनेजर प्रीतीलता गायकवाड, डब्ल्युओटीआरचे अभियंते अमित गुंजाल, डब्ल्युओटीआरचे विनय पगडे आणि निफाणवाडीच्या रहिवासी मंगल पवार उपस्थित होते.


निफाणवाडीच्या रहिवासी मंगल पवार यांनी सांगितले, टाटा स्टीलने पाण्याची टाकी बांधण्यासाठी पावले उचलली याबद्दल मी त्यांचे आभार मानते. आमच्या गावातील २२ घरांचे नूतनीकरण कंपनीने करून दिले, त्यानंतर आता आम्ही पाण्याचा अधिक चांगला पुरवठा केला जाण्याच्या प्रतीक्षेत आहोत. या प्रकल्पामुळे आमची ती निकड पूर्ण होईल. महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारावी आणि टाटा स्टीलच्या प्लांटच्या आजूबाजूच्या भागात राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना पाण्याचा पुरवठा सुरळीतपणे होत राहावा यासाठी डब्ल्यूईई (विमेन एम्पॉवरमेंट अँड एंट्रप्रिन्युअरशिप) आणि डब्ल्यूओटीआर (वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

## आरोग्य प्रहर

# तणावापासून मिळवा मुक्ती

तणाव दीर्घकाळ राहिल्यास चिंतेचे रूप धारण करतो. मानसिक एकाग्रता ढळते. डोकेदुखी सुरू होते. अभ्यासात अडचणी येतात. मन व शरीरावर तणावाचे अनिष्ट परिणाम होतात. अनेकदा मानसिक संतुलनही बिघडते. चिडचिडेपणा, संताप वाढतो. झोप न येणे, डोकेदुखी, मायग्रेन, नैराश्य, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, ॲसिडिटी, अल्सर, केस झडणे आदी व्याधी मागे लागतात. तणाव वाढल्यास लोक मद्य, ड्रग्ज, धूम्रपान सेवन सुरू करतात. त्यामुळे तात्पुरते बरे वाटत असले तरी तणाव कायमस्वरूपी दूर होत नाही. शिवाय यामुळे आरोग्याच्या इतर समस्याही सुरू होतात. त्यामुळे तणाव दूर करण्यासाठी जीवन पद्धती बदलण्याची गरज आहे.

* आपल्या क्षमतेनुसार काम करा. ताकदीबाहेरचे काम करू नका. त्यामुळे न्यूनगंड निर्माण होऊन तणाव वाढतो.
* जास्त शत्रू निर्माण करू नका. जय-पराजयाच्या भावना फार तीव्र नकोत.
* सतत काम करणे टाळा. विश्रांतीही घ्या.
* आपल्या गरजा कमी करा.
* आकस्मिक घडणाऱ्या घटनांकडे शांत चित्ताने पाहा.
* नेहमी सकारात्मक विचार करा. नकारात्मक विचारांना कायम दूर ठेवा.
* आपल्या मनाला सल्ला द्या. एखाद्या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी शांतपूर्वक विचार करा.
* पुढच्यास ठेच मागचा शहाणा, या म्हणीतून शिका. मागचे अनुभव पुढच्या वाटचालीसाठी मार्गदर्शक ठरतात.
* तणावासंदर्भात तुमचे जवळचे मित्र, नातेवाईक यांच्याशी चर्चा करा. चर्चेने तणाव हलका होतो.
* रासायनिकदृष्ट्याही तणाव वाढतो. उदा. कॅफीन जास्त पोटात गेल्यास विशिष्ट हार्मोन्स वाढून तणावही वाढतो.
* नियमित व्यायाम, योग, फिरणे, पोहणे, नृत्य यामुळे शरीर सैलावते. तणाव कमी होतो.
* नियमित ध्यान व प्रार्थना केल्यास तणाव कमी होतो.
* दिवसभरात सतत काम न करतात थोडी विश्रांतीही द्यावी. शांतपणे बसून दीर्घ श्वास घ्या व तो हळूहळू सोडा.
* आपली एक दिनचर्या बनवा. प्रत्येक गोष्टीसाठी विशिष्ट वेळ द्या.



# खोपोलीतील आदिवासीबहुल क्षेत्रात आरोग्य शिबिर


(छाया : विनायक माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय मार्फत खोपोली शहरातील मिळ कातकरवाडी, मुळगाव ठाकुरवाडी या आदिवासीबहुल क्षेत्रात सर्व रोग निदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मोतीबिंदू, गरोदर माता, स्तनदा माता, मलेरिया, कोविड-१९, मधुमेह, उच्च रक्तदाब यांच्या तपासण्या करण्यात आल्या.

खोपोली नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी गौतम बगाडे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संगिता वानखेडे, डॉ. कोठारी, डॉ. गिरी, सिस्टर इन्चार्ज कोजगे, महालक्ष्मी लॅबच्या मयुरी सकपाळ, राजेश मोते यांच्यासह माताबाल संगोपन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिरात जिल्हा बालरोग तज्ज्ञ संघटना अध्यक्ष डॉ. प्रमोद वानखेडे, डॉ. अमोल गोसावी, डॉ. अविनाश राऊत यांनी एकूण १७७ शिबिरार्थींची तपासणी केली.

# भाजपतर्फे मुरूडमध्ये नेत्रतपासणी शिबिर


(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

शिवजयंती निमित्त तालुका भाजप आणि ज्येष्ठ नेते जनार्दन (आण्णा) कंधारे यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूडमध्ये रक्तदाब, मधुमेह आणि नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या दोन दिवसीय शिबिराचे उद्घाटन महिला मोर्चा पाखाडी अध्यक्ष अपर्णा अशोक कारभारी यांच्या हस्ते करण्यात आले. तर जनार्दन कंधारे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आरोग्य तपासणीस सुरुवात करण्यात आली.

भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष बाळा भगत, महेश मानकर, सरचिटणीस नरेश वारगे, पाखाडी अध्यक्ष सुधीर पाटील, अल्पसंख्यक महिला अध्यक्ष नसीम हनीफ उलडे, प्रवीण बैकर, अभिजित पानवलकर, माजी तहसीलदार नयन कर्णिक, प्रवीण भायदे, परेश किल्लेकर, सुनील खेऊर, किशोर म्हसळकर आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

या दोन दिवशीय शिबिरातील सर्व सेवा मोफत मिळणार असून नागरिकांनी याचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आण्णा कंधारे यांनी केले. शिबिराच्या पहिल्याच दिवशी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.

# कर्जतमध्ये उभे राहणार कामाख्या मंदिर

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील पोसरी गावात आसामच्या धर्तीवर भव्य कामाख्या मंदिर उभे राहणार असून, या मंदिराच्या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी (दि. १८) सकाळी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा यांच्या हस्ते करण्यात आले.

स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी हिमंता बिस्वा यांचे स्वागत केले. या भूमिपूजन सोहळ्याला कर्जतचे नगरसेवक संकेत भासे, पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे यांच्यासह मंदिराचे विश्वस्त व पोसरी ग्रामस्थ उपस्थित होते. पोसरी येथील नियोजित कामाख्या मंदिरासाठी आसाम येथून माती आणण्यात येणार आहे.

मंदिर उभारण्यासाठी येणारा सर्व खर्च आसाम सरकार करणार असल्याची माहिती या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजक रूपांतली बरुआ यांनी दिली.

# कर्जत कोठींबे येथे संत रोहिदास जयंती उत्सव


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील कशेळे ग्रामपंचायत हद्दीतील कोठींबे येथे संत रोहिदास यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

संत रोहिदास मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या जयंती उत्सवाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. जि.प. सदस्य नारायण डामसे, कशेळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच आदित्य गायकवाड तसेच अरुण घाग, अनिरुद्ध खडे, कृष्णा जाधव, मंगेश पवार, नरेश मोरे, मयुर शहा, हनुमंत खडे, संत रोहिदास मित्र मंडळाचे कार्यकर्ते रमेश सातवे, विलास गरुडे, अरुण गायकवाड, बबन गायकवाड, जगन गायकवाड, शंकर गायकवाड, अमोल सोनवणे, अक्षय गरुडे, दीपक गायकवाड, विकी गायकवाड, जितेंद्र सोनावळे, गौतम सोनावळे यांच्यासह ग्रामस्थ या जयंती सोहळ्याला उपस्थित होते. या वेळी भांडारा सोहळा आयोजित करण्यात आला होता.



# प्रो कबड्डी लीग : यूपी वि. पुणे आज पहिली एलिमिनेटर लढत

**बंगळुरू : वृत्तसंस्था**
प्रो कबड्डी लीगमध्ये सोमवारी (दि. २१) यूपी योद्धा आणि पुणेरी पलटण या दोन संघांमध्ये पहिली एलिमिनेटर लढत रंगणार आहे. यांच्यातील विजेता उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात पाटणा पायरेट्सविरुद्ध भिडेल. प्रो कबड्डी लीगच्या अखेरच्या साखळी लढतीत पाटणा पायरेट्सकडून ३०-२७ अशा पराभवामुळे हरियाणा स्टीलर्सचे आव्हान संपुष्टात आले. याचा फायदा पुणेरी पलटणला होऊन ते बाद फेरीत प्रवेशकर्ते झाले. अखेरच्या चढाईपर्यंत रंगतदार ठरलेल्या या सामन्यात एक मिनिट बाकी असताना विकास खंडोलाची अव्वल पकड झाली आणि सामना हरियाणाकडून निसटला. पाटण्याकडून सचिनने महत्त्वाची भूमिका बजावली. पाटणा, दबंग दिल्ली आणि यूपी योद्धा या तीन संघांनी बाद फेरी आधीच निश्चित केली होती. अखेरच्या दिवशी गुजरात, बंगळुरू बुल्स आणि पुणेरी पलटण या तीन संघांनी बाद फेरी गाठली, तर हरियाणा आणि जयपूरची वाटचाल संपुष्टात आली. दरम्यान, दुसरी एलिमिनेटर लढत २३ फेब्रुवारी रोजी गुजरात जायंट्स वि. बंगळुरू बुल्स यांच्यात होईल आणि यामधील विजेता उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात दबंग दिल्लीशी दोन हात करेल. मग अंतिम सामना २५ फेब्रुवारी रोजी रंगणार आहे.

# यश धुलचा डबल धमाका

## लागोपाठ शतकांसह नोंदवला नवा विक्रम

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**
भारताच्या अंडर-१९ विश्वविजेत्या संघाचा कर्णधार यश धुलने यंदाच्या रणजी ट्रॉफीमध्ये धमाकेदार कामगिरी सुरू ठेवली आहे. पदार्पणाच्या सामन्याच्या दोन्ही डावात शतक झळकावणारा धुल हा दिल्लीचा पहिला आणि एकूण तिसरा फलंदाज ठरला आहे.

यशने गुवाहाटी येथे खेळल्या गेलेल्या रणजी ट्रॉफी सामन्याच्या चौथ्या दिवशी तामिळनाडूविरुद्ध दुसऱ्या डावात नाबाद ११३ धावांची खेळी केली. पहिल्या डावात शतकी योगदान देणाऱ्या धुलने दुसऱ्या डावात १४ चौकार आणि एक षटकार



लगावला. हा सामना अनिर्णित राहिला. यापूर्वी गुजरातचा नरी कॉन्ट्रॅक्टर आणि महाराष्ट्राचा विराट आवटे यांनी रणजी करंडक पदार्पणाच्या सामन्याच्या दोन्ही डावात शतके झळकावली होती. १९ वर्षीय उजव्या हाताचा फलंदाज यशने मधल्या फळीतील फलंदाज म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. सलामीवीर म्हणून त्याने पहिल्यांदाच रणजी ट्रॉफीमध्ये प्रवेश केला आणि दोन्ही डावात चमकदार कामगिरी केली.

या सामन्यात दिल्लीने पहिल्या डावात ४५२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात तामिळनाडू संघाने ४९४ धावा केल्या. दिल्लीने दुसरा डाव २२८ धावांवर एकही विकेट न गमावता घोषित केला. यशशिवाय ध्रुव शौरीने दुसऱ्या डावात नाबाद १०७ धावांची खेळी केली.

# बामणडोंगरी संघाने जिंकला मानाचा आमदार चषक

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**
श्री गणेश न्हावेखाडी यांच्या वतीने आमदार चषक पनवेल-उरण २०२२ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जयेश गोल्ड टीम बामणडोंगरी यांनी विजेतेपद पटकाविले. विजेत्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १९) पारितोषिक वितरण करण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास न्हावा ग्रामपंचायतीचे सदस्य सागरशेठ ठाकूर, माजी सदस्य अरुणशेठ ठाकूर, प्रकाश कडू, न्हावेखाडी अध्यक्ष गोपीचंद ठाकूर, मधला पाडा अध्यक्ष नरेश मोकल, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, युवा कार्यकर्ता स्वप्नील ठाकूर, सदाशिव ठाकूर, अमर म्हात्रे, नील ठाकूर उपस्थित होते. या स्पर्धेत न्हावा येथील नटराज संघ उपविजेता ठरला. विजेत्या व उपविजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# बोनशेत येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

## भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन







**पनवेल : रामप्रहर वृत्त**
चिपळाई क्रिकेट क्लबतर्फे कै. नामदेव दिनकर पाटील यांच्या स्मरणार्थ आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पनवेल तालुक्यातील बोनशेत येथील आझाद मैदानावर रविवारी (दि. २०) करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजप पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, चिपळ्याचे माजी उपसरपंच धनंजय पाटील आदी उपस्थित होते. दरम्यान, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या स्पर्धेला भेट दिली. या वेळी त्यांचे आयोजकांच्या वतीने युवा नेते विश्वजीत पाटील यांनी स्वागत केले. जि. प. सदस्य अमित जाधव, सुकापूर भाजप अध्यक्ष राजेश पाटील, युवा नेते हॅप्पी सिंग, हर्षवर्धन पाटील उपस्थित होते.

**पनवेल : शहर भाजप पुरस्कृत खांदा कॉलनी येथील आई मित्र मंडळाच्या वतीने रविवारी आई प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी आयोजक मोतीलाल कोळी यांनी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांचे स्वागत केले, तर परेश ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.**







**पनवेल : इंटर पनवेल क्रिकेट कमिटी आणि ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. कंपनीच्या वतीने शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर आयपीपीएल अर्थात इंटर पनवेल प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी भेट दिली. या वेळी त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. नगरसेवक अनिल भगत सोबत होते.**

# वृद्धिमान साहाचा गांगुली, द्रविडवर गंभीर आरोप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**
अपेक्षित कामगिरी करण्यात सातत्याने अपयशी ठरणाऱ्या वृद्धिमान साहाला श्रीलंकेविरुद्ध मालिकेसाठी भारताच्या कसोटी संघातून वगळण्यात आले आहे. संघातून डच्चू देण्यात आल्याने साहा प्रचंड नाराज झाला असून त्याने संताप व्यक्त केला आहे.

वृद्धिमान साहाने राहुल द्रविड नेतृत्व करीत असलेल्या संघ व्यवस्थापनाने आपल्याला यापुढे निवड करताना विचार केला जाणार नसल्याचे सांगत निवृत्तीचा सल्ला दिल्याचा खुलासा केला आहे, तर बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुलीने आपल्याला संघातील स्थान पक्के असून चिंता करू नको, असा शब्द दिला होता, असा दावा साहाने केला आहे.





भारतीय जनता पार्टी पनवेल तालूका महिला मोर्चा अंतर्गत
उलवे नोड -२ महिला मोर्चा कमिटी तर्फे
" हळदी कुंकू समारंभ "

आपणांस कळविण्यात आनंद होत आहे की, भारतीय जनता पार्टी उलवे नोड -२ महिला मोर्चा कमिटी यांच्या वतीने सोमवार दि.२१/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता " हळदी कुंकू " समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी कृपया आपण सर्व महिला वर्गांनी आवर्जून उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही नम्र विनंती.

❊ कार्यक्रमाच्या उद्घाटक ❊
मा. सौ. शकूंतला रामशेठ ठाकूर
मा. सौ. कविता किशोर चौतमोल (महापौर - पनवेल महानगरपालिका)

❊ प्रमुख पाहूणे ❊
लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब (माजी खासदार -रायगड)
मा.श्री.अरूणशेठ भगत साहेब (तालूका अध्यक्ष - पनवेल भाजपा)
सौ. सायली म्हात्रे (नगराध्यक्षा - उरण नगरपालिका)
सौ.सिताताई पाटील (उपमहापौर - पनवेल महानगरपालिका)
श्रीमती. देवकीबाई कातकरी मॅडम (सभापती पनवेल पंचायत समिती)
मा.श्री.वाय.टी.देशमूख (जिल्हा प्रवक्ते- भाजपा)
सौ.रत्नप्रभा अरूण घरत (म.मो.तालूका अध्यक्षा -पनवेल भाजपा)
श्री.विजय हिरा घरत (अध्यक्ष भाजपा उलवे नोड -२)

❊ प्रमुख उपस्थिती ❊
सौ.दर्शना भोईर (नगरसेविका प.मनपा)
सौ.निता माळी (नगरसेविका प.मनपा)
सौ.कल्पना ठाकूर (माजी नगरसेविका प.मनपा)
सौ.मंजूळा कोळी (सदस्या ग्रा.पं.बहाळ)
सौ.निकिता खारकर (उलवे नोड-१ अधक्ष्या म.मोर्चा)
सौ.अनूसया घरत
सौ.नंदा ठाकूर
सौ.जयश्री देशमूख
सौ.अनिता ठाकूर
सौ.यमूनाबाई पाटील
सौ.इंद्रायणी कोळी
सौ.शोभा ठाकूर
सौ.कमळाबाई म्हात्रे
सौ.संगिता कोळी
सौ.संगिता म्हात्रे
सौ. धनवंती पाटील
सौ.शांताबाई अ. भगत (जेष्ठ नेत्या)
सौ.हेमलता भगत (माजी सरपंच ग्रा.पं. गव्हाण)
सौ.हौसाबाई कोळी (माजी सरपंच ग्रा.पं. गव्हाण)
सौ.सूगंधा कोळी (माजी सदस्या उलवे ग्रा.पं)
सौ.शिल्पा म्हात्रे (सचिव प.ता.भाजपा)
सौ.इंदूमती ना.म्हात्रे
सौ.आशा म्हात्रे
सौ.देवकीबाई ठाकूर
सौ.नर्मदा घरत
सौ.कविता भगत
सौ.कूसुम ठाकूर
सौ.नंदा भाऊ भोईर
सौ.जयश्री ग.घरत
सौ.सूमन म्हात्रे
सौ.मानसी देशमुख
सौ.सूशिला ज.घरत (नगरसेविका प.मनपा)
सौ.कविता खारकर (सरपंच ग्रा.पं. उलवे)
सौ.मंजूषा ठाकूर (उपसरपंच ग्रा.पं.न्हावा)
सौ.लिना पाटील (सरचिटणीस प.ता.भाजपा)
सौ.सूनिता घरत (सदस्या ग्रा.पं.गव्हाण)
सौ.इंदूताई पाटील
सौ.मनिषा घरत
सौ.शांताबाई पं.ठाकूर
सौ.बानूबाई अ.भगत
सौ.सूनिता कोळी
सौ.मनिषा ठाकूर
सौ.पूर्वा वास्कर
सौ.चेतना म्हात्रे
सौ.शेवंता भगत
सौ.निशा म्हात्रे
सौ.वर्षा नाईक (पनवेल शहराध्यक्ष)
सौ.चैताली कोळी (सरपंच ग्रा.पं. तरघर)
सौ.गिता ठाकूर (सदस्या ग्रा.पं.वहाळ)
सौ.प्रतिभा भोईर (सरचिटणीस प.ता.भाजपा)
श्रीमती. गिरिजाबाई कातकरी (सदस्या ग्रा.पं.गव्हाण)
सौ.स्नेहलता ठाकूर
सौ.जयश्री कोळी
श्रीमती. राधाबाई ठाकूर
सौ.सिमा भगत
सौ.अरुणा कोळी
सौ.जोत्स्ना ठाकूर
सौ.मिनाक्षी पाटील
सौ.प्रिया शिंदे
सौ.निकिता पाटील
सौ.योगिता ठाकूर

गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा, न्हावा, न्हावेखाडी से. ८, ९, १०, १६, १७,१८ येथील
सर्व महिला मंडळ व महिला बचत गट तसेच सर्व महिला वर्ग

❊ आपले नम्र : सौ. योगिता भगत (भाजपा महिला मोर्चा उलवे नोड - २ अध्यक्षा), सौ. सूजाता पाटील (उपाध्यक्षा), सौ.कामिनी कोळी (उपाध्यक्षा), सौ.मिना मनोहर म्हात्रे (उपाध्यक्षा), सौ.उषा देशमूख (चिटणीस), सौ.रंजना पाटील (चिटणीस), सौ.सूमन पाटील, सौ.शूभांगी पाटील,सीना वर्गिस, अर्चना मिश्रा,मिसा स्नेहा,सविता बिराजदार,दिप्ती चव्हाण,निलू विश्वकर्मा,अंजू सिंग

❊ कार्यक्रमाचे ठिकाण :- सेक्टर -१७,प्लॉट नं.१२४, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्स समोर
सोमवार दि.२१/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com